# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१९/०६/२०१६.

**१) हुंडयासाठी नकार दिल्याने विवाहीतेस जाळून जिवानिशी ठार केले. :—**

दिनांक १७/०६/२०१६ रोजी ०२.३० वा. पुर्वी **आरोपीतांनी संगमताने कट रचुन विवाहीत महीला, वय २४ वर्ष हीला माहेरून हुंडा आनण्याची मागनी केली. परंतु विवाहीत महीला हीने नकार दिल्याने तिच्या अंगावर मातीचे तेल टाकुन पेटवुन जिवानीशी ठार मारल्याने** फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व मर्ग क्र. ४२/१६ कं. १७४ जा.फौ. चे तपासा वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०२,३०४(ब)(२), १२०(ब),३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोनि. राऊत पो. स्टे. साकोली हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपींना अटक करण्यात आली.

**२) अंगावर रॉकेल टाकुण विवाहीतेस जाळण्याचा व जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०६/०१६ रोजी ०९.३० वा. दरम्यान यातील ५ आरोपींपैकी आरोपी क्र १ यांनी आरोपी क्र २ ते ५ यांना समान उद्दिष्टे साधण्यासाठी आपल्या सोबत घेवुन फिर्यादीस " **तु मला पोटगीसाठी जेलमध्ये का टाकलीस " असे बोलुन मारपीट करून सोबत डबकीत आनलेला रॉकेल फिर्यादीच्या अंगावर टाकुण जाळण्याचा व जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला. असे** फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३०७,१४३,१४९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली.

**३) म.रा.वि.वि. कार्यालय येथील संगणक व संबधीत साहित्यांची चोरी . :—**

दिनांक १७/०६/०१६ रोजी ००.१८ ते २२.०० वा. दरम्यान फिर्यादी विलास वसंतराव लिमजे, वय ३७ वर्ष (सहा. अभियंता म.रा.वि.वि कार्यालय कारधा) याचे म.रा.वि.वि. कार्यालय कारधा येथील समोरील दाराचा ताला कोणीतरी **अज्ञात चोराने तोडुन आत प्रवेश करून त्यात एक लिनीओ कंपनीचा संगणक, १एच.पी कंपनीचा प्रिंटर, युपीएस असा एकुण २०,०००/—रु. चा माल चोरून नेला. असे** फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरून चाकुने मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १७/०६/०१६ रोजी ११.०० वा. दरम्यान आरोपी हा घरी येवुन फिर्यादी रोशन रमेश सोलंकी व त्याची आई वर्षाबाई सोलंकी यांच्या सोबत **जेवण करण्याचे कारना वरून भांडण, शिवीगाळ करून चाकुने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या तळव्यावर, आंगठयावर, उजव्या पायाच्या तळव्याला व डाव्या हाताच्या मनगटावर मारून जखमी करून जिवे मारण्याची व धमकी दिली. असे**

फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.

**५) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :–**

दिनांक १८/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, तुमसर व पवनी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारू कि. ११००/–रू. व २ लिटर ५२० मि.ली. देशी दारू कि. ७००/–रू. तसेच जुगारातुन ११७/–रू. असा एकुण कि. १,९१७/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.